# समिती दर्पण

सप्टेंबर २०२३

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पाहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्चशिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहेत, त्यात ७५० विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्वविकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# विद्यार्थ्यांना मिळाली उद्योजकतेसाठी प्रेरणा

## अमेरिकेतील मराठी उद्योजक आशिष अचलेरकर यांची समितीला भेट

प्रतिकूल परिस्थितीला संधी मानले तर किती उंच झेप घेता येते, याचे प्रत्यक्ष उदाहरण अमेरिकेतील मराठी उद्योजक आशिष अचलेरकर यांच्या रुपाने समितीतील विद्यार्थ्यांना अनुभवता आले.

अमेरिकेतील 'नीयर यू सर्व्हिसेस' या काही हजार कोटींची उलाढाल असलेल्या कंपनीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अचलेरकर यांनी १५ सप्टेंबरला समितीला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी अचलेरकर यांनी आपला जीवनप्रवास उलगडला. नगर जिल्ह्यातील लोणी या गावात मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचा जन्म झाला. ते लहान असताना या गावात दिवसात फक्त एक एसटी यायची. अशा गावातून गुणवत्तेच्या जोरावर अचलेरकर यांनी पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात (सीओईपी) प्रवेश मिळवत अभियांत्रिकीची पदवी घेतली. एमएस अभ्यासक्रमासाठी ते परदेशात गेले. त्यानंतर त्यांनी एमबीए केले. आज अमेरिकेतील मोठ्या कंपनीचे सीईओ असले तरी आपले मूळ ते विसरलेले नाहीत. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्यात त्यांचा कायम पुढाकार असतो. ज्या महाविद्यालयातून त्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले, त्या सीओईपीला त्यांनी नुकतीच ८.२५ कोटी रुपयांची देणगी दिली.

समितीतील कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उद्योग, व्यवसाय, परदेशातील संधी यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली. उद्योग - व्यवसाय सुरू करण्याबाबत मार्गदर्शन तर केलेच, शिवाय यश मिळवत आकाश झेप घेताना, पाय जमिनीवर ठेवावे, आपले संस्कृती, मूल्य याचा विसर पडता कामा नये, असा सल्लाही दिला. श्रमप्रतिष्ठेचा विचार घेऊन कष्टाला प्रामाणिकतेची जोड दिल्यास उद्योजकतेचा प्रवास सुकर होतो, असे त्यांनी सांगितले.





### आशिष अचलेरकर म्हणाले...

- उद्योग- व्यवसाय करायचा तर मेहनतीला पर्याय नाही
- मनातील विचार प्रत्यक्ष कृतीत आणून सातत्याने प्रयत्न केल्यास हमखास यश
- तुम्ही छोट्या गावातून आलेले असला तरी त्याचा न्यूनगंड बाळगू नका.
- उद्योजक होण्यासाठी हवी इच्छाशक्ती, प्रखर मानसिकता, त्याचबरोबर धोका पत्करण्याची तयारी
- उद्योगात चारित्र्य आणि विश्वासार्हताही महत्त्वाची.
- कुटुंबाला पुरेसा वेळ द्या.

### समितीचे काम पाहून प्रभावित

समितीचे विश्वस्त तुकाराम गायकवाड, डॉ. मकरंद फडके यांनी अमेरिका दौऱ्यात आशिष अचलेरकर यांची भेट घेऊन त्यांना समितीविषयी माहिती दिली होती. ती ऐकून प्रभावित झालेले अचलेरकर भारतात येताच समितीत आले. समितीच्या सर्व वसतिगृहांची त्यांनी पाहणी केली. समितीच्या कामकाजाची बारकाईने माहिती घेतली. व्यग्र दिनक्रम असतानाही सुमारे साडेतीन तास त्यांनी समितीत व्यतित केले. जी अपेक्षा केली होती, त्याहीपेक्षा चांगले काम पाहायला मिळाले, अशी प्रतिक्रिया त्यांनी विश्वस्तांशी बोलताना व्यक्त केली.

## अमेरिकेतून आले पाहुणे

अमेरिकास्थित मराठी माणसांपर्यंत समितीची माहिती पोचवावी आणि त्यांना समितीच्या कामात सहभागी करून घ्यावे, या उद्देशाने अध्यक्ष प्रतापराव पवार, विश्वस्त तुकाराम गायकवाड, डॉ. मकरंद फडके यांनी जुलैमध्ये अमेरिका दौरा केला. या दौऱ्यामुळे तेथील अनेक मराठी व्यक्तींमध्ये समितीविषयी कुतुहल निर्माण झाले आहे. त्यामुळेच सध्या अमेरिकेत वास्तव्य असलेले अजित दिघे, डॉ. चंद्रशेखर केळकर, श्री. व सौ. कुर्लेकर, विनायक केळकर यांनी सप्टेंबरमध्ये भारतात येताच आवर्जून समितीच्या वसतिगृहांना भेट दिली. गायकवाड यांच्याक़डून त्यांना समितीच्या कामाविषयी माहिती मिळाली होतीच, पण त्याहीपेक्षा कितीतरी पटीने चांगले काम येथे होत असल्याची प्रतिक्रिया या पाहुण्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर समितीच्या उपक्रमांना सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

## समितीच्या १२५ स्वयंसेवकांचा निर्माल्य संकलनात सहभाग

अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जनाच्या वेळी पुण्यातील मुठा नदीवरील पाच प्रमुख घाटांवर राबविण्यात आलेल्या निर्माल्य संकलन आणि जनजागृती मोहिमेत विद्यार्थी साहाय्यक समितीच्या सव्वाशे स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.सकाळ सोशल फाउंडेशनच्या वतीने बांधकाम क्षेत्रातील रांजेकर रियल्टी यांच्या सौजन्याने राबविलेल्या या उपक्रमाला महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहकार्य लाभले. निर्माल्य संकलनाबरोबर जनजागृतीसाठी घोषवाक्यांचे फलकही नदीकाठी लावण्यात आले.

## दुर्वा जुड्यांच्या कामातून १५० मुलामुलींची कमाई

गणेशोत्सवासाठी दुर्वा आणि गणेशपत्री यांच्या जुड्या तयार करण्याचे काम कमवा- शिका योजनेअंतर्गत मिळाले होते. गणपतीसाठी २१ दुर्वा आणि गणेशपत्री यांच्या जुड्या तयार करायच्या होत्या. १५ ते १८ सप्टेंबर या काळात हे काम झाले. यात दीडशे मुलामुलींनी सहभाग घेतला.

# नव्या तंत्रज्ञानाला कल्पनांची जोड द्यावी

## अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना प्रतापराव पवार यांचा सल्ला

### अभियंता दिन

**पुणे :** 'सध्याचा काळ नव्या तंत्रज्ञानाचा आहे. सातत्याने बदलणारे तंत्रज्ञानाचे प्रवाह आत्मसात करणे आवश्यक आहे. ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी नवे प्रवाह स्वीकारून, त्याला नवकल्पनांची जोड दिली पाहिजे. बारामतीमध्ये रोबोटिक्ससंदर्भात अतिशय उत्तम काम सुरू आहे. त्याची माहिती विद्यार्थ्यांनी घ्यावी,' असे विद्यार्थी साहाय्यक समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी सांगितले.

विद्यार्थी विकास केंद्र आणि इंजिनिअरिंग क्लब यांच्या वतीने अभियंता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सिंबायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. सायली सांडभोर, रोबोटिक्सतज्ज्ञ आणि सल्लागार मुकुंद कोंडवीकर, विद्यार्थी विकास केंद्रप्रमुख सुप्रिया केळवकर, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त रत्नाकर मते आदी उपस्थित होते.

कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी मनोगत मांडले. सुप्रिया केळवकर यांनी समितीच्या कार्याची माहिती दिली. समितीतर्फे आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्रांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धांच्या परिक्षणासाठी सुनिल चोरे, ओंकार वाघमारे व गणेश चव्हाण यांनी सहकार्य केले. अंशूकुमारी हिने सूत्रसंचालन केले. आकाश दुबे, ऋतुजा सुडके आणि श्रुती भोसले यांनी इतर सहकारी विद्यार्थ्यांच्या मदतीने संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले.



**आधुनिक काळात नवे तंत्रज्ञान हा कळीचा मुद्दा आहे. त्यासोबत विद्याशाखांचे असंख्य पर्याय उपलब्ध आहेत. तरुणाईने आपला कल, बलस्थाने यांचा योग्य विचार करून, व्यावसायाभिमुख दृष्टिकोन ठेवावा.**

– **प्रतापराव पवार**, अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती

**प्रत्येक उद्योग- व्यवसायाची एक संस्कृती, कार्यपद्धती असते. ती समजून घेत, तुम्ही सर्वोत्कृष्ट ते योगदान द्यावे, ही अपेक्षा असते. तुमची उद्दिष्टे कंपनीच्या उद्दिष्टांशी सुसंगत हवीत. कुठल्याही क्षेत्रात काम करताना तुमची जिज्ञासा, सर्जनशीलता, निरीक्षणशक्ती पाहिली जाते.**

– **मुकुंद कोंडवीकर**, रोबोटिक्सतज्ज्ञ आणि सल्लागार

**अभ्यासाच्या जोडीने अन्य पूरक उपक्रमांतही विद्यार्थ्यांचा सहभाग असला पाहिजे. त्यातून आत्मविश्वास वाढतो. व्यक्तिमत्व विकासाला पूरक गोष्टी घडतात. तरुण वयातली प्रचंड ऊर्जा, उत्साह, चैतन्य, प्रयोगशीलता हे सारे आपल्या ध्येयापर्यंत घेऊन जाण्यासाठी पूरक पद्धतीने कार्यरत होतात.**

– **डॉ. सायली सांडभोर**, वरिष्ठ प्राध्यापक, सिंबायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी

## समितीच्या कामाची नवप्रवेशितांना ओळख

समितीत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी- विद्यार्थिनींच्या स्वागतासाठी तसेच त्यांना समितीच्या कामाची, समितीतील कर्मचारी आणि कार्यकर्ते यांची ओळख व्हावी, यासाठी १४ सप्टेंबरला परिचय सभा आयोजित केली होती. यावेळी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, विद्यार्थी विकास केंद्राच्या प्रमुख सुप्रिया केळवकर, विश्वस्त संजय अमृते, डॉ. ज्योती गोगटे, विनया ठोंबरे, कार्यकर्ते दिनकर वैद्य, हरिश अष्टेकर आदींनी समितीचे काम, विद्यार्थ्यांचा दिनक्रम याविषयी माहिती दिली. तसेच समितीमध्ये कार्यरत उपसमित्या आणि त्यात काम करणारे कार्यकर्ते यांची ओळख करून दिली.

## प्रवेश प्रक्रिया पूर्ण, ३०२ नवीन विद्यार्थी

समितीत या सत्रातील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असून पाचही वसतिगृहांमध्ये मिळून एकूण ७६७ विद्यार्थी- विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आला आहे. यावर्षी १ जुलैपासून ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. ती २० सप्टेंबरपर्यंत सुरू होती. सुमारे ३०० नवीन जागांसाठी १२४४ विद्यार्थ्यांचे अर्ज आले. त्यातील ९९२ विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी बोलावण्यात आले होते. ४६५ विद्यार्थी- विद्यार्थिनींना पुनर्प्रवेश दिला, तर नवीन प्रवेशित एकूण मुलामुलींची संख्या ३०२ आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव

## चांद्रयान-३ मोहिमेचा देखावा




विद्यार्थी साहाय्यक समितीच्या लजपतराय, डॉ. आपटे व सुमित्रा सदन वसतिगृहात दरवर्षीप्रमाणे यंदाही पर्यावरणपूरक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या तिन्ही वसतिगृहात यंदा भारताची यशस्वी चांद्रयान-३ मोहिम देखाव्यातून साकारण्यात आली होती. पुठ्ठे आणि परिसरातील मातीतून साकारलेल्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली होती. सजावटीसाठी परिसरातील टाकाऊ वस्तूंचा उपयोग केला होता.

## 'अभया'ने केली जागृती



विद्यार्थी साहाय्यक समितीत दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवानिमित्ताने आयोजित केलेल्या ज्ञानसत्रात २१ सप्टेंबर रोजी डॉ. आपटे वसतिगृहात स्त्रीवरील अन्यायाविरुद्ध न्यायाची दाद मागणारी....'अभया' हे प्रायोगिक नाटक सादर करण्यात आले. त्या माध्यमातून मुलामुलींना लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणाऱ्या पॉस्को- २०१२ या कायद्याविषयी माहिती देण्यात आली.

या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन मीना नाईक यांनी केले असून चिन्मयी स्वामी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या नाटकात सहभाग घेतला. संकटात असूनही खचून न जाता, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या एका मुलीची आणि तिच्या कुटुंबाची ही कथा आहे. हे नाटक अन्यायाविरुद्ध लढायला शिकवतेच त्याचबरोबर पॉक्सो कायद्याविषयी जनजागृती करते. या कार्यक्रमाला समितीचे कार्यकारी विश्वस्त, विश्वस्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकर्ते, पाचही वसतिगृहाचे पर्यवेक्षक तसेच आजी- माजी विद्यार्थी उपस्थित होते.



## पाककला स्पर्धेत 'लंबोदर' प्रथम

गणेशोत्सवानिमित्त २२ सप्टेंबरला लजपत संकुलातील पुसाळकर हॉलमध्ये पाककला स्पर्धा झाली. या स्पर्धेसाठी यावर्षी 'पुलाव' हा पदार्थ होता. पुलाव तयार करण्यासाठीचे सर्व साहित्य स्पर्धकांना पुरविण्यात आले. एकूण ३२ मुलामुलींनी स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धकांचे एकदंत, वक्रतुंड, लंबोदर, विघ्नहर्ता असे चार गट केले होते. परीक्षक श्री. प्रभाकर पाटील यांनी विद्यार्थ्यांना पाककला स्पर्धेचे महत्त्व सांगितले. त्याचबरोबर गॅस सिलिंडर जोडण्याचे प्रात्यक्षिकही काही विद्यार्थ्यांकडून करून घेतले. स्पर्धेत 'लंबोदर' गटाने प्रथम क्रमांक मिळवला. प्रभाकर पाटील यांनी या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# समितीतील प्रवेशामुळे आयुष्याला कलाटणी

शिंपल्यातील मोती

मी मूळची जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील शिरसगावची. घरची परिस्थिती बेताची. घरात कोणतीही शैक्षणिक पार्श्वभूमी नव्हती. माझ्या गुणवत्तेवर मला नवोदय शाळेत प्रवेश मिळाला. सीबीएसईचे शिक्षण घेता आले. परंतु पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरी बारावीनंतरचे शिक्षण घेणे म्हणजे माझ्यासाठी दिवास्वप्नच होते.

पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात शास्त्र शाखेत प्रवेश मिळाला, परंतु राहण्याचा मोठा प्रश्न होता. माझ्या एका मैत्रिणीने मला विद्यार्थी साहाय्यक समितीची माहिती दिली. तेथे प्रवेशासाठी अर्ज केला. समितीतील प्रवेश माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. माझ्या आयुष्यात अशा कितीतरी गोष्टी होत्या, ज्या मला कदाचित कधीच परवडल्या नसत्या. पण त्या मला समितीत उपलब्ध झालेल्या संधीमुळे मिळवता आल्या. मला माझे केवळ स्वप्नवत वाटणारे उच्च शिक्षण समितीमुळे पूर्ण होऊ



शकले. बीएस्सी पूर्ण केले. वनस्पतीशास्त्र विषय घेऊन एमएस्सी केले. सेटनेट परीक्षा उत्तीर्ण झाले. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेत यश मिळविले. वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून माझी निवड झाली. माझ्या या संपूर्ण यशाचे श्रेय मी समितीतील संस्कार आणि समितीत मला मिळालेल्या संधी यांनाच देईन.

**सोनाली शेषराव इंगळे**
वनपरिक्षेत्र अधिकारी
समिती वास्तव्य - २०१४-२०१७

# 'बापल्योक'मधील लेकाने उलगडले समितीशी नाते

## अभिनेता, पटकथाकार विठ्ठल काळे यांच्याशी संवाद; आठवणींना उजाळा

नागराज मंजुळे, मकरंद माने या दिग्गजांनी दिग्दर्शित केलेल्या बापल्योक चित्रपटाचा नायक, पटकथाकार आणि समितीचे माजी विद्यार्थी (२००९-२०११) विठ्ठल काळे यांनी चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर ४ सप्टेंबरला समितीला भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

समितीतून बाहेर पडल्यानंतरचा बारा वर्षांचा प्रवास उलगडत असताना त्यांनी समितीतील आठवणींनाही उजाळा दिला. विद्यार्थी विकास केंद्र आणि माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमात मंडळाचे सचिव सुनिल चोरे यांनी विठ्ठल काळे यांच्याशी संवाद साधला. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, विद्यार्थी विकास केंद्राच्या प्रमुख सुप्रिया केळवकर यांच्यासह कार्यकर्ते, माजी विद्यार्थी, आजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी काळे यांचा सत्कार करण्यात आला.

आयुष्यातील सगळे दुःख उरात घेऊन लेकरांना मायेची ऊब देणारा बाप बाहेरून कठोर वाटत असला, तरी आतून तो प्रेमळ असतो. बाप-लेकाचे नाते उलगडण्याचा, कुटुंबासाठी अहोरात्र झटणाऱ्या बापाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न 'बापल्योक'मधून केला आहे, अशी भावना विठ्ठल काळे यांनी व्यक्त केली. अंगारकी मांडे हिने सूत्रसंचालन केले.



**माझ्या या यशात माझी मेहनत, चिकाटी महत्त्वाची आहेच; पण त्याहून मला समितीत मिळालेला आधार अधिक महत्त्वाचा आहे. ध्येयावर लक्ष केंद्रित करून मेहनत करत गेलो. बारा वर्षे आणि ३६ चित्रपट केल्यानंतर प्रमुख भूमिका मिळाली. हा संघर्ष मोठा होता. या संघर्षात समिती परिवाराचा मोठा वाटा आहे.**

- **विठ्ठल काळे**, अभिनेता

# विद्यार्थ्यांच्या अंगीभूत गुणकौशल्यांचे कौतुक

## आगळ्या उपक्रमाला आपटे वसतिगृहातून सुरुवात; दरमहा होणार निवड

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला आणि त्यांच्या अंगीभूत गुणकौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्या संकल्पनेतून २६ सप्टेंबरला एका आगळ्यावेगळ्या उपक्रमाला सुरुवात झाली.

समितीतील प्रत्येक वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांमधून समितीची शिस्त, योगा, चार तास काम, अवलोकन, विद्यार्थी विकास केंद्राच्या कार्यक्रमांमधील योगदान तसेच विद्यार्थ्यामध्ये असलेले विशेष कौशल्य ओळखून वेल परफॉर्मिंग स्टुडंट (Well Performing student) म्हणून काही विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. त्यांचे कौतुक करून त्यांना समितीचे अध्यक्ष पद्मश्री प्रतापराव पवार यांचे वाटचाल हे पुस्तक भेट देण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात आपटे वसतिगृहातून झाली.

**निवड झालेल्या आपटे वसतिगृहातील विद्यार्थिनी-**


सानिका भुजबळ (कार्यतत्परता), माधुरी सुरवसे (वर्तणूक, उत्तम नर्तक), अनुष्का राऊत (संस्कृत भाषेचे विशेष ज्ञान, पुस्तकवाचन), ऋतुजा हिरे (पुढाकार आणि सहभाग), साक्षी कासार (वर्तणूक), अनुष्का खांबे (उत्तम खेळाडू, प्रत्येक कामात आवडीने सहभाग, टापटीपपणा), भाग्यश्री मंडवाले (विद्यार्थी विकास केंद्रातील विशेष योगदान), अनुष्का खैरे (कराटे, बॉक्सिंग चॅम्पियन).

प्रत्येक महिन्यात हा विद्यार्थी कौतुक सोहळा होणार असल्याचे तुषार रंजनकर यांनी सांगितले.



मैत्री पुस्तकांशी

## शिवकाळाची अनुभूती




सर्वांच्या मनावर राज्य करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र रणजित देसाई यांच्या श्रीमान योगी या पुस्तकात वाचायला मिळते. या पुस्तकात महाराजांचे युद्धकौशल्य, राजनीती, दूरदृष्टी, शत्रूला गाफील ठेवण्याचे तंत्र, माणसांची असलेली पारख आदी बाबी समजतात. अफजलखान भेट, शाहिस्तेखानाला दाखवलेला कात्रजचा घाट, आग्र्याहून सुटका असे अनेक प्रसंग कादंबरी वाचताना डोळ्यांसमोर उभे राहतात.

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार समजून घेण्यासाठी श्रीमान योगी वाचणे महत्त्वाचे आहे. राजांचे अनेक गुण, अनेक विचार आजच्या काळाशी मिळते जुळते आहेत, हे पुस्तक वाचताना लक्षात येते.

**पुस्तकाचे नाव :** श्रीमान योगी
**लेखक :** रणजीत देसाई

- **अरविंद काळे**, लजपत भवन

## स्वातंत्र्योत्तर काळाचा लेखाजोखा




श्री. अविनाश धर्माधिकारी लिखित ७५ सोनेरी पाने या पुस्तकामध्ये स्वतंत्र भारताच्या इतिहासातील अविस्मरणीय अशी क्षणचित्रे रेखाटलेली आहेत.

आजच्या तरुणाईलाच नव्हे तर, भारत देशात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला त्याला मिळालेल्या स्वातंत्र्याची जाणीव असावी व स्वातंत्र्यानंतरच्या काळात घडलेल्या घटनांची माहिती असावी, या हेतूने हे पुस्तक लिहिले गेले आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली. या काळात भारताने जी अभिमानास्पद अशी गौरवशाली वाटचाल केलेली आहे. त्याचा लेखाजोखा या पुस्तकामध्ये लेखकाने मांडला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून राजकारण, समाजकारण, लोकशाही, अर्थशास्त्र, विज्ञान- तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रांत देशाला कशा प्रकारे बळकटी येत गेली, याची माहिती वाचायला मिळते. देशाच्या प्रत्येक नागरिकाने वाचलेच पाहिजे, असे पुस्तक आहे.

**पुस्तकाचे नाव :** ७५- सोनेरी पाने
**लेखक :** अविनाश धर्माधिकारी

- **ओंकार रामदास शिंदे**

आवर्जून वाचावे असे काही...

**दोन मने** (लेखक : वि. स. खांडेकर)

माणसाला दोन मने असतात. एक पशूचे आणि दुसरे देवाचे. ते कसे... हे सांगणारे हे पुस्तक आहे.

**साम्राज्यशाही** (लेखक : सुलभा ब्रह्मे)

साम्राज्यशाही जागतिकीकरणाचा खरा चेहरा समजून घेण्यासाठी हे पुस्तक वाचले पाहिजे.

**सहवास** (लेखक : यशवंतराव गडाख)

यशवंतराव गडाख यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय हे पुस्तक वाचताना येतो.

**शहीद भगतसिंग एक झंझावात** (लेखक : प्रकाश रेड्डी)

शहीद भगतसिंग यांचा जीवन प्रवास या पुस्तकात उलगडून दाखवला आहे.